श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचलीत,

# पं. ज. ने. समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर, जि.जळगाव

Recognised U/S 2 (f)

NAAC प्रमाणित B ग्रेड

कवयित्री बहिणाबाई चौधरी

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,संलग्नीत

आणि सामाजिक न्याय विभाग, महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त

# शैक्षणिक सहल अहवाल

# 2021-22

कार्यक्रम अधिकारी

प्रा. डॉ.जे.एस.सोनवणे

प्राचार्य

प्रा.डॉ.पी.एस.पाटील

## संस्था भेट क्र. - 1
## धर्मदाय आयुक्त कार्यालय, नाशिक
## 1. सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय, नाशिक

**प्रस्तावना -**

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचलित पं.ज.ने. समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर येथील MSW II वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक सहलीच्या पहिल्या दिवशी धर्मदाय सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय, नाशिक येथे सर्वप्रथम.





**संस्थेची कार्य -**

धर्मदाय सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालयीतील निरीक्षक श्री. झाडे सरांनी आम्ही सर्व प्रथम आमची ओळख करुन दिली. तसेच आमचा त्यांच्या कार्यालयाला भेट देण्याचा उद्देश सांगितला व त्यांना त्यांच्या कार्यालयाच्या कामकाज विषयी माहिती देण्याची विनंती केली त्यानंतर त्या कार्यालयातील निरीक्षक श्री. झाडे सर व त्यांचे सहकारी श्री. लाडतो सर यांनी आम्हाला त्यांच्या कार्यालयाविषयी माहिती दिली व ती पुढील प्रमाणे.

धर्मदाय सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालय हे एक शासकीय कार्यालय असुन हे नाशिक विभागीय कार्यालय आहे. या कार्यालयाची स्थापना 1860 साली झाली या कार्यालयाद्वारे M.R.T. Act 1950 M.P.T.Act द्वारे व काही सोशल Act द्वारे विविध संस्थांची नोंदणी करणे, तपासनी करणे, तक्रार निवारण करणे, इ. प्रकारची कामे केली जातात.

या कार्यालया अंतर्गत मंदीर, दर्गा, पारसी आजारी व चर्च इ. धार्मिक संस्थांची नोंदणी होत असते. तसेच शाळा महाविद्यालय, चॅरिटेबल, दवाखाने इ. सामाजिक संस्थांची देखिल नोंदणी करणे. होत असते. वरील संस्थांची नोंदणी करण्यासाठी सर्वप्रथम या कार्यालयामार्फत मंत्रालयात पत्र पाठविले जाते. व त्या पत्रास संमती मिळाल्यानंतर त्या संस्थांना मान्यता मिळते व संस्था नोंदणी होते.

वरील प्रकारच्या धार्मिक व सामाजिक संस्थांसोबतच या कार्यालयामध्ये विविध प्रकारच्या बहुउद्देशिय संस्था, धार्मिक उत्सव, गणेशउत्सव, दुर्गा माता उत्सव इ. कार्यासाठी जी वर्गणी गोळा होत असते त्यासाठी देखील हा कार्यालयात नोंदणी करणे आवश्यक असते वरील कामांसाठी या कार्यालयाअंतर्गत शासन नियमानुसार नोंदणी होते व त्याला या कार्यालयात नोंदणी न करता कुठल्याही प्रकारची वर्गणी गोळा केली तर तो नियमानुसार कायदेशिर कार्यवाही करुन शिक्षा दिली जाते.

**निरीक्षण -**

धर्मदाय सार्वजनिक न्याय नोंदणी कार्यालयात निरीक्षकांनी क्षेत्रकार्य नोंदणी कार्यालयात निरीक्षकांनी क्षेत्रकार्यकर्त्यास चर्चेच्या माध्यमातुन त्यांच्या कार्यालयाची संपुर्ण माहिती दिली. तसेच या कार्यालयाचे कामकाज कश्या प्रकारे चालते हे जाणुन घेता आले.

## संस्था भेट क्र. - 2

## 2. प्रादेशिक उपायुक्त समाजकल्याण विभाग नाशिक

**प्रस्तावना -**

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचनित प.ज.ने.समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II च्या विद्यार्थ्यांनी समाजकल्याण विभागाला भेट दिली.

महाराष्ट्र शासनाच्या 2011 च्या जनगणनेनुसार जवळपास 1 कोटी 22 लाख अनुसूचित जातीच्या लोकांसाठी डिपारमेंन्ट काम करत असे. तसेच इतर मागासवर्गीय या सर्व जातीचे कामकाज हे समाजकल्यान कडे असायच आता समाजकल्यान विभागाकडुन हे बाकीचे विभाग आणि महिला बालकल्यान स्वतंत्र झाले आहे. तसेच दिव्यांग आयुक्तालय स्वतंत्र झाले आहे. हे आता NT, OBC, ST हे इतर मागास बहुकल्यान स्वातंत्र मंत्रालय झाले आहे आता मंत्रालय आणि आयुक्तालय समाजकल्यानचे अधिकारी हे काम करीत आहे. आता फक्त अनुसूचित जाती राहिले आहेत. त्याच्यात अनुसूचित जातीच्या ज्या योजना आहेत म्या म्हणजे शिष्यवृत्ती हे सर्व या समाजकल्यानच्या योजनेतुन मिळत असते.

राज्यात एकुण 450 सरकारी होस्टेल या समाजकल्याण च्या माध्यमातुन चालवल्या जात आहे आणि त्या होस्टेल मध्ये एकुण 50000 विद्यार्थी होस्टल मध्ये राहत आहे. होस्टेल मध्ये निवासाची मोफत सेवा दिली जाते. दोन वेळचे भोजन व परत विद्यार्थ्याला महिन्याला भत्ता दिला जातो. तसेच वर्षात एक वेळा स्टेशनरी खर्च दिला जातो त्यात विद्यार्थी आपला ड्रेस कोड व त्याला शाळा कॉलेजला लागनारी वस्तु तो घेऊ शकतो अश्या प्रकारची विद्यार्थ्यांना सोय केली जाते.

तसेच सर्व अनुसूचित जाती - जमातीच्या विद्यार्थ्यांच्या खर्च संस्था करते त्याचप्रमाणे उसतोड करणा-या कामगारांच्या मुलांची शिक्षणाची सोय पन या संस्थांद्वारे केली जाते. आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्याला 50 हजार रुपये हे समाजकल्यान मार्फत दिले जातात. ज्यांच्याकडे जमिन नाही अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांनाही अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना अल्प सुधारक बाळासाहेब गायकवाड स्वाभीमान व सबळीकरण योजना आहे. त्यात अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील व्यक्तिना शासनाकडुन जमिनीची खरेदी 50 टक्के बिनव्याजी व 50 टक्के अनुदान स्वरुपात रक्कम दिली जाते. त्यात जमिन खरेदी करुन ती भुमिहीन अनुसूचित जाती प्रवर्गातील कुटुंबांच्या पती-पत्नीच्या नावे केली जाते मात्र विधवा व परित्यक्त्या स्त्रियांच्या बाबतीत जमिन त्यांच्या नावे केली जाते.

अशी माहिती जनसंपर्क अधिकारी शशिकांत पाटील यांनी आम्हाला दिली.




## संस्था भेट क्र. - 3

## 3. महिला आणि बाल कल्याण विभाग नाशिक

**प्रस्तावना -**

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचलित पं.ज.ने. समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II चे विद्यार्थी महिला आणि बाल कल्याण विभागिय कार्यालयाला भेट दिली तेथील माहिती जाणुन घेतली तेथील सुनंदा बडगुजर मॅडमांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली.




**संस्थेची कार्य -**

सामाजिक न्याय विभागाअंतर्गत हे सगळे उपक्रम राबविले जातात त्यात आयुक्त विभागीय कार्यालय मार्फत विविध योजना सामाजिक न्याय विभागाच्या अंतर्गत महिला व बालविकास चे काम झा ाले. यात खुप अनेक प्रकारचे पदाधिकारी असतात.

1. सहाय्यक आयुक्त वर्ग प्रथम
2. समाज कल्यान अधिकारी वर्ग दुय्यम
3. निरीक्षक सहाय्यक त्यात वरीष्ठ व कनिष्ठ सहाय्यक पदे असतात.

या पध्दतीचे सरंचना कच्ची कामकाज असतात अशाप्रकारे कार्यालयांची कामे चालतात. तसे बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अंतर्गत विद्यार्थ्यांना राहण्या खाण्याची सोय होत असते. म्हणजेच स्वाधार योजना होय सामाजिक विकास योजना मार्फत आमदार, खासदार असतात तरी हे लोक त्यांचे लोकप्रतिनिधी असतात तरी त्यांना कुठे कसले काम आहेत असे कळविण्याची कामे शासनाला करतात तसेच शिष्यवृत्ती स्वाधार योजना ही गरीब विद्यार्थ्यांला शैक्षणिक पात्रतेसाठी मदत करणे तो जिथे राहतो, शिकतो तेथे संपुर्ण खर्च ह्या

योजनेअंतर्गत होत असतो तसेच धुळे, नंदुरबार, नाशिक, जळगांव या चारही जिल्हाचे काम येथुन होत असते तेथील वसतीगृह तेथील समाजकार्य विभागाअंतर्गत जे काही योजना राबविल्या जातात त्यांचे सर्व काम इथुन होत असते तसेच मॅडमांनी आम्हाला दक्षता समितीबद्दल माहिती सांगितली त्या पिडीत महिलांचे पुनर्वसन केले जाते. व त्यांना देखील काम करण्याची संधी दिली जाते.
या प्रमाने मॅडमांनी संस्थेबद्दल माहिती सांगितली.

## संस्था भेट क्र. - 4

## 4. आदिवासी विकास विभाग नाशिक

**प्रस्तावना -**

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचनित प.ज.ने.समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II च्या विद्यार्थ्यांनी आदिवासी विकास विभाग नाशिक येथील संस्थेची कार्य कश्याप्रकारे चालतात याची माहिती घेतली.

आदिवासी विकास महामंडळ ही प्रवर्तक असलेली एक सेवाभावी संस्था असुन महामंडळाच्या मुख्य उद्देश राज्यातील आदिवासींची आर्थिक पिळवणुक थांबवुन त्यांचा सर्वांगीण विकास घडवुन आणने हा आहे या उद्देशाने कार्य करण्यासाठी प्रभावी साधन म्हणुन महाराष्ट्र शासनाने या महामंडळाची सन 1972 मध्ये स्थापना केली.

आदिवासी विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. 500 कोटी व वसुल झा ालेले भाग भांडवल रु. 198 कोटी एवढे असुन वार्षिक उलाढाल जवळ-जवळ रु. 198 कोटी एवढी आहे.

ज्या दोन प्रमुख उद्दिष्टांना आधारीत महामंडळ कार्य करते ती खालील प्रमाने.

1. आदिवासी शेतकरी आदिवासी कारागीर आणि आदिवासी भुमिहीन मजुर यांची आर्थिक विळवणुक नाहिशी करण्यासाठी प्रभावी साधन म्हणुन कार्य करते.
2. आदिवासीच्या आर्थिक विकास संवर्धनासाठी प्रत्यक्ष सहाय्यच्या योजना हाती घेणे.





**नवसंजीवन योजना -**

शासन निर्णय क्रमांक हि एस.पी.1091 मंत्रालय दि. 22 जुन 1995 अन्वये नवसंजीवन योजना दिनांक 1 मे 1995 पासुन सुरु करण्यात आली आहे. ही योजना महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी उपाययोजना क्षेत्रामध्ये राबविण्यात येईल नवसंजीवन योजनेमध्ये महामंडळामार्फत राबविण्यात येत असलेल्या खावटी कर्ज योजना, धान्यकोष योजना द्वारा वितरण योजना इ.
आदिवासी विकास महामंडळाकडील योजना खालीलप्रमाणे आहेत.

1. एकाधिकारी खरेदी खेजना
2. खावटी कर्ज वाटप योजना

3. आधारभुत किंमत खरेदी योजना 4. द्वार वितरण योजना

5. ऐच्छिक हिरडा खरेदी

6. दारीद्रय रेषे खालील आदिवासी कुटुंबांना स्वयंपाकासाठी गॅस युनिट पुरवठा योजना.

या विभागामध्ये राज्य शासनाकडुन तरतुद येते दुसरी तरतुद ही केंद्र शासनाकडुन आहे. राज्य शासनाच्या जो निधी येतो त्यामधुन काही निधी फक्त आदिवासी लाभार्थ्यांसाठी आहे आदिम जमाती विकास म्हणजे तिथं फक्त आदिम जमातीचे लाभार्थी आहेत नाशिक विभागांमध्ये पेठ आणि त्र्यंबकेश्वर भागांमध्ये आदिवासी जमातीचे लोक आहेत त्याच्यासाठी केंद्रशासनाकडुन विशेष केंद्रीय सहाय्य निधी येतो.

केंद्र शासनाच्या आणि राज्यशासनाच्या आदिवासी जमातीसाठी एकुन बजेट च्या 11 टक्के बजेट हा आदिवासींसाठी राखिव असतो त्या बजेट मधुन ज्या योजना प्रस्तावित असतात त्या योजना केंद्र शासनाकडे घेऊन जातात. आणि नंतर मुख्यमंत्र्याच्या मान्यतेने यांच्यातले काही ठराविक योजना मंजुर करतो आणि त्यासाठी निधी दिला जातो आणि त्या योजनांच्या आपल्या स्तरावर राबविले जातात.

## संस्था भेट क्र. - 5

## 5. समाजकार्य महाविद्यालय नाशिक

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचनित प.ज.ने.समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II च्या विद्यार्थ्यांनी समाजकार्य विद्यालय नाशिक येथील संस्थेची कशाप्रकारे कार्य चालतात याची माहिती घेतली.






**संस्थेची कार्य** -

मराठा विद्या प्रसारक विद्यालय 1914 साली स्थापन झाली या संस्थेचे स्थापन करणारे श्री. अशोक थोरात विसपुते आहेत. त्या काळात संस्थेला स्वत: शाहुमहाराजांनी सुध्दा भेट दिली आहे. आणि त्या काळामध्ये 500 रुपयांची भेट ही त्यांनी महाविद्यालयाला दिली त्या काळात बहुजन समाजाला शिक्षणापासुन लांब ठेवत जात होते. आणि म्हणुन बहुजन समाजाचे व शेतकरी वर्गात वंचित समाजाचा धरतीवरती या संस्थेची स्थापना झ ाा ालेली आहे. आणि तेव्हा पासुन ही संस्था अनियमितपणे चालु आहे.

18000 सभासद असणारी ही संस्था आहे. संस्था त्यांच्यामधुन दर 3 वर्षांनी इलेक्शन होते व त्यातुन सभासदांची निवड केली जाते आणि लोक राहतील त्या पध्दतीने या संस्थेचे काम चालते 1993 साली पाहिली बॅच मध्ये बाहेर पडले नंतर अनेक बॅचेस बाहेर पडले नंतर अनेक बॅचेस येत गेल्या महाविद्यालयाची ग्रंन्ड आली. नंतर 100 टक्के ग्रॅंड आली आणि पुन्हा शिक्षकांची भरती झाली आपल्या कवियित्री बहिनाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात जसे आदिवासी कल्याण आहे तसे नाशिकला फक्त आदिवासी कल्यान हे स्पेशिअल आहे. विद्यार्थ्यांसाठी 3 - 4 वर्ग आहेत त्यांनतर क्षेत्रकार्य चालत क्षेत्रकार्याचे प्रेसेंटेशन होते विद्यार्थ्यांनी क्षेत्रकार्यात काय

काम/ किंवा जे काम केले ते प्रेसेंट केले जाते क्षेत्रकार्याला विद्यार्थ्यांची 100% प्रसेंटी असते क्षेत्रकार्य दोन दिवस केले जाते मंगळवार आणि बुधवार अशा प्रकारची संस्थेबद्दल माहिती आम्हाला दिली.

## संस्था भेट क्र. - 6

## 6. चाईल्ड लाईन नाशिक

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचनित प.ज.ने.समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II च्या विद्यार्थ्यांनी MVPS समाजकार्य महाविद्यालयाला भेट दिली.

MVPS या कॉलेजच्या माध्यमातुन Child Line Service Project हा राबवल्या जात आहे हा Project 2011 साला पासुन कार्यरत आहे जेव्हा आपन पाहतो की एखादे मुल आजारी आणि एकटे आहे. जेव्हा आपन एखाद्या मुलाला आश्रयाची गरज आहे जेव्हा आपन पाहतो एखादे मुल हरवलेले आहे किंवा सोडुन दिलेले आहे. जेव्हा आपन पाहतो एखाद्या मुलाला मार दिला जात आहे किंवा त्याचा छळ केला जात आहे. जेव्हा आपन पाहतो की काम करणा-या मुलाला त्याचे/ तिचे वेतन दिले जात नाहिये. जेव्हा आपन पाहतो एखादे मंल रस्त्यावर धमकावले पिटले जात आहे तेव्हा आपन चाईल्ड लाईन 1098 ला कॉल करुन सांगु शकतो की ह्या मुलांवर अश्या अश्या प्रकारचा छळ झाला आहे हरवलेली मुले अत्याचारग्रस्थ मुले अत्याचारग्रस्त मुले पळुन गेलेली मुले अनर्थकारी परिस्थितीतील मुले वेश्याव्यवसायासाठी आणलेली मुले कामाला लावलेली मुले. काळजी घेण्याची आणि संरक्षण देण्याची गरज आहे अशी सर्व मुलांचे पुनर्वसन केले जाते आणि त्याच्यावर सतत लक्ष ठेवले जाते.

सर्वात पहिले मुल किंवा मुलाबद्दल चिंता वाटणारी प्रौढ व्यक्ती 1098 ला फोन करते. त्या मलाचे किंवा त्या व्यक्तीचे बोलणे चाईल्डलाईन आधाररेखा केंद्राशी जोडले जाते. त्यानंतर चाईल्डलाईनच्या चमुत्या मुलाला मदत करण्यासाठी धावुन तो मग त्या नंतर त्या मुलाचे पुनर्वसन केले जाते आणि त्याच्यावर सतत लक्ष ठेवले जाते.

चाईल्डलाईन ही काळजी घेण्याची आणि संरक्षण देण्याची गरज असणा-या मुलांसाठीची राष्ट्रीय 24 तास चालु असणारी, फोन केल्यावर तातडीने मदत देणारी सेवा आहे. महिला आणि बाल विकास या केंद्रीय मंत्रालयाचा चाईल्डलाईनला आधार आहे. आणि चाईल्डलाईन राज्य सरकार NGOs अलाइड सिस्टीम आणि कॉपोरेट सेक्टरशी जोडलेली आहे.



## संस्था भेट क्र. - 7

## 7. अभिव्यक्ती संस्था नाशिक

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचनित प.ज.ने.समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II च्या विद्यार्थ्यांनी  अभिव्यक्ती मिडीया फोर डेव्हलपमेंट या संस्थेला भेट दिली.



**संस्थेची कार्य -**

अभिव्यक्ती मिडीया फोर डेव्हलपमेंन्ट या संस्थेची स्थापना 1987 या साली झाली तसेच संस्था 1987 पासुनच कार्यरत आहे.

अभिव्यक्ती ही संस्था ग्रामिण भागातील आदिवासी लोकांना मदत करते अभिव्यक्ती हे सामाजिक बदल घडवुन आणण्यासाठी काम करते. 1984 पासुन शाश्वत विकासासाठी माध्यम आणि संप्रेशन सुलभ करत आहे. स्वयंसेवी संस्थाचे माध्यम आणि संप्रेशन संसाधने वाढवुन नागरीक्त, स्थनिक प्रशासन आणि सामाजिक न्याय मजबुत करणे हे संस्थेचे ध्येय आहे.

ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या मिडीयाद्वारे सोडविण्याचे काम करते मिडीया तयार करने त्या मिडीयाद्वारे लोकांना समस्येचे शोध लावुन त्यांना स्वत: ती सोडविण्यास तयार करणे Community कडुन Video च्या Technical पध्दतीने स्वत: अभिव्यक्ती व्हावा ही आम्ही व आमची मिडीया काम करते.

1. माध्यम निर्माण करणे.
2. Deepening Co-learning

3. Networking & Advocary
4. Support

**संस्थेचा उद्देश -**

एक मिडीया तयार करणे व लोकांना अभिव्यक्त होण्यासाठी प्रयत्न करने.

**भविष्यकालीन योजना -**

जास्तीत जास्त प्रमानात लोकांमध्ये जन-जागृती व्हावी आणि ग्रामीण भागातील समस्या दर झा ाल्या पाहिजेत.

**कर्मचारी वर्ग -**

15 कर्मचारी (Rural Medea)

10 कर्मचारी ऑफीस स्टाप

## संस्था भेट क्र. - 8

## 8. माऊली प्रतिष्ठान अहमदनगर

**प्रस्तावना -**

श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचनित प.ज.ने.समाजकार्य महाविद्यालय, अमळनेर तर्फे MSW II च्या विद्यार्थ्यांनी माऊली प्रतिष्ठान अहमदनगर या संस्थेची कार्य कश्या प्रकारे चालतात याची माहिती घेतली.

या संस्थेत बेघर व अत्याचार ग्रस्त महिलांचे संगोपन केले जाते संस्थेत एकुण 400 महिला व त्यांची 35 मुली आहेत त्यांना संस्थेत राहण्याची खाण्याची सर्व प्रकारची सोय संस्थेत केली जाते. जेव्हा त्यांना संस्थेत आणले जाते तेव्हा त्या महिलांची मानसिक स्थिती ही खालावलेली असते त्यानंतर त्यांना अंघोळ वगेरे घालुन त्यांना पुर्णपणे स्वच्छ करुन त्यांच्यावर उपचार केले जातात. महिलांवर अत्याचार झाल्याने त्यांची मानसिक स्थिती खालावलेली असते व त्या खुप चिड - चिड झालेल्या असतात. त्यांच्यावर उपचार झाल्यावर त्या ब-हाही होतात आणि ज्या स्त्रियांवर बलात्कार झाला आहे अश्या स्त्रिया गरोदर होऊन त्यांना झालेल्या बाळाची काळजी देखिल या संस्थेत घेतली जाते.

तसेच संस्था कोणाच्या निधीवर अवलंबुन न राहता, महिला स्वत:चा शेतात भाजीपालीची लागवड करतात व तो भाजीपाला विकतात तसेच शेणामातीची भांडे बनवने जसे की दिवे, कफलदानी, व ही भांडे बनवुन विकने तसेच स्त्रिया जे काही अलंकार वापरतात जसे की कानातले, नेकलेस, ब्रेसलेस, बांगड्या इ. वस्तुसुध्दा त्या महिला स्वत:च्या हाताने बनवतात व विकतात.







श्रम साफल्य एज्युकेशन सोसायटी संचलीत,

पं. ज. -ो. समाजकार्य महाविद्यालय, अमळ-ोर, जि.जळगाव

Recognised U/S 2 (f)

NAAC प्रमाणित B ग्रेड

कवयित्री बहिणाबाई चौधरी

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,संलग्नीत

आणि सामाजिक  न्याय विभाग, महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त